| | | |
|---|---|---|
| MHRT100004602025 | प्रकरण दाखल तारीख | २०/०८/२०२५ |
| | प्रकरण नोंदल्याची तारीख | २०/०८/२०२५ |
| | निकाल दिनांक | ०६/०४/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महीने दिवस<br>०० ०७ १७ |

**भाग 'अ'**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (I) )**
**राजापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी - श्रीमती एस. एस. हाके)**

| | |
|---|---|
| **संक्षीप्त फौजदारी खटला क्र.२२६/२०२५** | **निशाणी क्र.०७ लगत** |
| **खटला क्रमांक** | संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२६/२०२५ |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलिस ठाणे अथवा राज्य उत्पादन शुल्क** | गु.र.क्र.१४४/२०२५, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी विभाग |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासनतर्फे राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी विभाग |
| **प्रतिनिधीत्व** | सरकारी अभियोक्ता श्री. बी. एस. सुपेकर. |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | **शरद शांताराम गुरव**<br>वय – ५८ वर्षे, धंदा - शेती,<br>रा. पाचल तळवडे गुरवाडी<br>ता.राजापूर, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | विद्वान विधीज्ञ श्रीमती आर.एस.बिर्जे |

भाग ब
(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(II))**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०९/०७/२०२५ |
| फिर्यादि पोलिस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०९/०७/२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २०/०८/२०२५ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १२/१२/२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २७/०३/२०२६ |
| निकालाची तारीख | ०६/०४/२०२६ |

| | |
|---|---|
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधीत नाही |

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामीनावर सोडलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली** | **दिलेली शिक्षा** | **फौ.प्र.सं. कलम ४२८ संपरिक्षेचे दरम्याने निरुध्द केलेल्या कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शरद शांताराम गुरव** | आरोपीस भा.ना.सु. सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली. | १२/१२/ २०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) | आरोपीस निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | -------- |

भाग क

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(III))**

**साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी साक्षीदारांची यादी**

| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **(पुराव्याचे स्वरुप ) साक्षीदाराची भुमीका** |
|---|---|---|
| सा. क्र.१ | सागर सखाराम उबाळे | फिर्यादी |

**ब. बचावाचे साक्षीदार - निरंक**

**क. अभियोगपक्षाच्या / बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी**

**अभियोगपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी**

| **वर्णन** | **निशाण** |
|---|---|
| फिर्याद | ९ |

**बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी - निरंक**

## मुद्देमाल

| मुद्देमाल वस्तू क्र. | वर्णन |
|---|---|
| १. | सु.७५० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या विदेशी मदयाच्या एकूण १२ काचेच्या सिलबंद बाटल्या त्याची कि.रु. ९१२० |
| २ | सु.१८० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित डिएसपी ब्लॅक व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ४० काचेच्या सिलबंद बाटल्या त्याची कि.रु. ५६००/- |
| ३. | सु.७५० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं. १ व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ७ काचेच्या सिलबंद बाटल्या त्यंची कि.रु. ४४८०/- |
| ४. | सु.१८० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं. १ व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ४८ काचेच्या सिलबंद बाटल्या त्यांची किं.रु. ७६८०/- |

**टिप-** मुद्देमाल न्यायालयात जमा नाही.

## न्यायनिर्णय
## (घोषणा दिनांक ०६/०४/२०२६)

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे -**

**०१.** दिनांक ०९/०७/२०२५ रोजी १४.०५ ते १४.४५ वाजताचे दरम्याने मौजे तळवडे गावचे हद्दीत घर नं. २२८ चे मागील जंगल भागात, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे जावून दारुबंदी गुन्हयाअंतर्गत छापा टाकला असता सदर ठिकाणी आरोपी हा स्वतःचे ताबे कब्जात सु.७५० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या विदेशी मदयाच्या एकूण १२ काचेच्या सिलबंद बाटल्या, सु.१८० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित डिएसपी ब्लॅक व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ४० काचेच्या सिलबंद बाटल्या, सु.७५० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं. १ व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ७ काचेच्या सिलबंद बाटल्या, सु.१८० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं. १ व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ४८ काचेच्या

सिलबंद बाटल्या असा एकूण रक्कम रुपये २६,८८०/- किंमतीचा मुद्देमाल विनापरवाना बेकायदेशीरपणे आरोपीने त्याच्या कब्जात बाळगला व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केलेला आहे असे अभियोगपक्षाचे कथन आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा दोषारोप आरोपीला त्याचे भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता, आरोपीने गुन्हा निशाणी क्र.०७ वर नाकबुल केला व खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्र.१ सागर सखाराम उबाळे या साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

**०२.** आरोपी विरुध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदयानुसार खटला चालविण्यात आला. आरोपीला गुन्हयाचे विवरण वाचून दाखविले असता आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे निशाणी क्र.०७ लगत येथे कथन केले. त्यावरुन प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

**०३.** अभियोगपक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष तपासून पाहिली असता, आरोपी विरुध्द पुराव्यामध्ये कोणताही गुंतवणारा पुरावा न आल्याने आरोपीचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार जबाब नोंदविण्याची आवश्यकता भासली नाही.

**०४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. उपरोक्त विवेचनावरुन म्हणजेच अभियोगपक्षाने सादर केलेल्या विवेचनावरुन माझ्या समोर खाली नमुद मुद्दे उपस्थित होतात व त्या मुद्दयांचे निष्कर्ष कारणांसहीत मी पुढीलप्रमाणे नोंदविले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ०९/०७/२०२५ रोजी १४.०५ ते १४.४५ वाजताचे दरम्याने मौजे तळवडे गावचे हद्दीत घर नं. २२८ चे मागील जंगल भागात, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | जावून दारुबंदी गुन्हयाअंतर्गत छापा टाकला असता सदर ठिकाणी आरोपी हा स्वतःचे ताबे कब्जात सु.७५० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या विदेशी मदयाच्या एकूण १२ काचेच्या सिलबंद बाटल्या, सु.१८० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित डिएसपी ब्लॅक व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ४० काचेच्या सिलबंद बाटल्या, सु.७५० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं. १ व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ७ काचेच्या सिलबंद बाटल्या, सु.१८० मिली मापाच्या गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं. १ व्हीस्कीच्या विदेशी मद्याच्या एकूण ४८ काचेच्या सिलबंद बाटल्या असा एकूण रक्कम रुपये २६,८८०/- किंमतीचा मुद्देमाल विनापरवाना बेकायदेशीरपणे आरोपीने त्याच्या कब्जात बाळगला व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केलेला आहे असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | | ...... नकारार्थी |
| २ | काय आदेश? | | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता**

०५. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ सागर सखाराम उबाळे यांना निशाणी क्र.०७ लगत तपासले. अभियोगपक्ष फिर्याद, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा या दस्तऐवजावर विसंबून आहेत. अभियोगपक्षातर्फे विद्वान विशेष सरकारी वकिल श्री. बी. एस. सुपेकर तर बचाव पक्षातर्फे विद्वान वकील श्री. आर.एस.बिर्जे यांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुतच्या खटल्यातील सरकारी साक्षीदार क्र.१ सागर सखाराम उबाळे यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात फिर्यादी प्रमाणे कथन केले आहे. ती फिर्याद निशाणी क्र.०९ येथे आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, घटनास्थळी कोणीही येवू जावू शकते. घटनास्थळी शहानिशा करण्यासाठी त्यांनी बनावट गिऱ्हाईक पाठविले

नव्हते. घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे हे त्यांना सांगता येणार नाही. त्यामुळे फिर्यादी यांनी योग्य फिर्याद दिली याबाबत संशय निर्माण होतो. तसेच सदर केसमधील दुसरे पंच व तपासी अधिकारी यांना ब-याच संधी देवूनही त्यांच्या साक्षी याकामी नोंदविण्यात आलेल्या नाही. त्याचप्रमाणे घटनास्थळ हे तेच आहे असे दर्शविण्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तरी आरोपीच्या ताब्यातून विदेशी दारु जप्त केल्याबाबत कोणताही विश्वसनिय पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामूळे सदर खटल्यात आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातील रसायन हे विदेशी दारु होती असे विनासंशय शाबीत होत नाही. त्याचप्रमाणे घटनास्थळ हे तेच आहे असे दर्शविण्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे रासायनिक परिक्षणाकरीता घेतलेले सॅम्पल स्वच्छ शिशित काढले होते किंवा कसे याबाबत उलगडा होत नाही. त्यामुळे आरोपीने आपल्याजवळ विदेशी दारु बाळगली, हे सिध्द होत नाही. उपरोक्त कारणामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकरार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२च्या उत्तरासाठी पुढील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **शरद शांताराम गुरव** यास कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा मधून कलम २७८(१) भारतीय नागरीक सुरक्षा संहितेनुसार निर्दोष सोडण्यात येत आहे.

२ आरोपीचे जामीन विसर्जीत करण्यात येत आहे.

३ आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार रु.१५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन बंधपत्र पुर्वीचे पुढे चालू ठेवण्यात येते.

४ सदर खटल्यातील दारुचा जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर कायदयाप्रमाणे नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, रत्नागिरी यांचेकडे पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.04.06 18:03:19 +0530

**दिनांक - ०६-०४-२०२६**
**ठिकाण- राजापूर**

**( एस. एस. हाके )**
**न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**राजापूर.**

CERTIFICATE

"Judgment/Order in :-Summary Criminal Case No. 226/2025

I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.

Name of Stenographer:- M. N. Patil

Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.

Date of Decision :- 06-04-2026

Judgment signed by P.O. on :- 06-04-2026.

Judgment uploaded on :- 06-04-2026.